P S P S's

# INDIRA INSTITUTE OF PHARMACY

**A Report on "Activities conducted on the occasion of National Pharmacy Week"**

**Date: 27th November 2021**

माजी राज्यमंत्री श्री. रवींद्रजी माने यांच्या प्रेरणेतून साडवलीच्या फार्मसी महाविद्यालयात विविध राष्ट्रीय औषधंशास्त्र सप्ताह २०२१ उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन साडवली येथील प्रबोधन शिक्षण प्रसारक संस्थेचे, इंदिरा इन्स्टिटट्यूट ऑफ फार्मसी येथे राष्ट्रीय फार्मसी आठवड्याचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, उन्नत भारत अभियान व भक्तश्रेष्ठ श्री. वालावलकर रुग्णालय, डेरवण आणि आय. सी. टी. सी. विभाग, ग्रामीण रुग्णालय, देवरुख यांच्या संयुक्त विद्यमाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

सदर उपक्रमांमध्ये श्री. स्वामी समर्थ रक्तपेढी, डेरवण यांच्यामार्फत रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. रक्तदानाच्या या महायज्ञात महाविद्यालयातील 15 विद्यार्थी व संपावर असून देखील महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या 15 कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले.

मान्यवरांनी महाविद्यालयीन उपक्रमास भरभरून दाद दिली व कोविड कालावधीत महाविद्यालयाची रक्तदानाच्या माध्यमातून समाजाप्रती जपलेल्या बांधिलकी बद्दल कौतुक केले. सदर शिबिरात ३० जणांनी रक्तदान करून सामाजिक हित साधले. ग्रामीण रुग्णालयाच्या अंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे एड्स व इतर संसर्गजन्य रोगांबद्दल समुपदेशन करण्यात आले. ग्रामीण रुग्णालयामार्फत एकूण १७० विद्यार्थ्यांचे एच. आई. व्ही. आणी डायबिटीस असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे रक्त शर्करा तपासणी शिबीर घेण्यात आले. महविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या पदवी आणी पदविका विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग नोंदवला.

विद्यार्थ्यांनी NPW - नॅशनल फार्मसी विकचा लोगो विद्यार्थ्यानं मानवी साखळी मार्फत साकारला.

सन २०२० मध्ये केंद्र सरकारच्या उन्नत भारत अभियाना अंतर्गत, आय. आय. टी. मुंबई आणी जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष, महाराष्ट्र राज्य यांच्या अंतर्गत कोविड १९ विषयावरील पोस्टर मेकिंग, निबंध व व्हिडिओ मेकिंग स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.

सदर स्पर्धांमध्ये राज्य व जिल्हा स्तरावर पारितोषिक मिळालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

उपक्रमांच्या उदघाटनप्रसंगी संस्थेचे चेअरमन श्री. रवींद्रजी माने, सौ. नेहा माने, सामाजिक कार्यकर्ते श्री यूयुतसू आर्ते, साडवली गावचे सरपंच श्री. राजू शेठ जाधव मीनाताई ठाकरे महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. बळवंत नलावडे, प्राचार्य डॉ. अमोल खाडे, पदविका विभाग प्रमुख श्री. सुजित नगरे, आय. सी. टी. सी. विभागाच्या सौ. वैशाली पुजारी, सौ. विद्या माने व इतर प्राध्यापक उपस्थित होते.

**Event Photographs**













